राज्यातील खाजगी उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर आणण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
सूचना पत्र क्रमांक : सौरप्र २०१९/प्र.क्र.२१७/ऊर्जा-७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०१ ऑगस्ट, २०१९.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे असाधारण महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाने अशा ऊर्जा स्त्रोतांद्वारे देशात सन २०२२ पर्यंत १७५ गिगावॅट एवढे वीज निर्मितीचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. यात १०० गिगावॅट सोर ऊर्जा निर्मितीचा समावेश आहे. यादृष्टीने देशभरात व राज्यात नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीजनिर्मितीचे कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत.

राज्य शासनाद्वारे शासन निर्णय दि.२० जुलै, २०१५ नुसार राज्याचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीच्या पारेषण संलग्न प्रकल्पासाठी एकत्रित धोरण २०१५ साली जाहीर केले आहे. याशिवाय शेतकऱ्यांना माफक दरात व दिवसा वीज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ज्या भागांमध्ये गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले आहे अशा ठिकाणी कृषी वाहिनींना सौर ऊर्जाद्वारे विलगीकरण करण्याच्या योजनेस शासन निर्णय दि.१४.०६.२०१७ नुसार मान्यता देण्यात आली असून, सदर योजना मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना म्हणून अंमलात आली आहे.

राज्यामध्ये उपलब्ध कोळसा, जमीन व पाणी तसेच औष्णिक ऊर्जा प्रकल्पांचा विचार करता प्रदुषण मुक्त व पर्यावरणस्नेही ऊर्जा निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे.

राज्य शासनाद्वारे शासकीय उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर आणण्याकरिता करण्याची कार्यवाही सुरु असून, त्याच धर्तीवर राज्यात खाजगी उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर आणण्याची बाबही विचाराधीन आहे. त्याअनुषंगाने राज्य शासनाद्वारे या संदर्भात प्रारुप धोरण महावितरणच्या सहाय्याने तयार केले आहे. प्रस्तूत धोरणाच्या अनुषंगाने त्यास मिळणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून

राज्य शासन व खाजगी उपसा सिंचन योजना प्रकल्पधारक व सर्व भागधारक यांना फायदेशीर होण्याच्या दृष्टीने अंतिमत: तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

राज्य शासनाद्वारे तयार करण्यात आलेल्या धोरणाचा प्रारुप मसुदा महावितरणच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन त्यावर संबंधितांकडून सूचना मागविल्यास असे धोरण सर्वसमावेशक होऊ शकते, ही बाब लक्षात घेऊन सूचना मागविण्याचे प्रस्तावित आहे.

यासोबत खाजगी सिंचन प्रकल्प सौर ऊर्जेवर आणण्याच्या प्रारुप धोरणाच्या अनुषंगाने संबंधितांना पुढील आठ दिवसांत आपले अभिप्राय / सूचना, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, प्रकाशगड, प्लॉट नं. जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेकडे पाठविण्यात यावेत. प्राप्त सूचना विचारात घेऊन व्यवहार्यता व अंमलबजावणीविषयक बाबी विचारात घेऊन धोरण अंतिम करण्याचे हक्क शासन राखून, पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(प्र.पु.बडगेरी)
शासनाचे उप सचिव

सोबत : वरील प्रमाणे.